**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४८

निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना जि. जालना

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अभयकुमार बलिराम यादव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नरेंद्र भगवानदास खंडेलवाल, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद जि.जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना जि.जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या

कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील पतमर्यादावितरणाशी, कामाशी व मजुरांना पुरविलेल्या सोयींशीसंबंधी काही माहिती मागितली होती. या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती. तर काही माहिती तहसीलदार, जाफ्राबाद यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री खूप प्रमाणात वळवावी लागत असल्याने, ही माहिती देण्यासाठी त्यांना वेळ लागणार असल्याचे नमूद केले असून त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने ही माहिती अपिलार्थीस पुरविणे शक्य होणार नाही, असेही त्यांनी या पत्रामध्ये म्हटले आहे. या पत्राच्या अखेरीस अधिनियमातील कलम ७(९) अन्वये त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. १२.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ३१.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १४.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती तात्काळ पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, माहितीपोटीच्या शुल्काची माहिती योग्य त्या मुदतीत न कळविल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन,या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी, हा प्रतिसाद आयोगास चुकीचा वाटतो, कारण अधिनियमातील कलम ७(९) च्या तरतुदीवरुन जन माहिती अधिकारी यांनी ते काढलेले अनुमान (Inference) आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप असे फारसे मोठे नव्हते की, ही माहिती देताना जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, हे दिसून येते. याहीपेक्षा दुसरी अशी महत्त्वाची बाब येथे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.८.२००७ रोजी आदेश देऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहितीपोटीच्या शुल्काबाबत काहीही कळविण्यात आले नाही. त्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती द्यावयाची होती किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती तहसीलदार, जाफ्राबाद यांच्याशी संबंधित होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाची एक प्रत तहसीलदार, जाफ्राबाद यांच्याकडे पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे, या प्रकरणी त्यांना भाग होते, तथापि त्यांनी यापैकी कोणतीही कृती न करता, अशारितीने अपिलार्थीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे माहितीपासून वंचित ठेवल्याचे दिसून येते. या घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास आढळून आले नाही. सबब जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तहसीलदार, जाफ्राबाद यांच्या कार्यालयाशी संबंधित जी माहिती अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे ती देखील त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये तहसीलदार, जाफ्राबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन पुरवावी.तहसीलदार, जाफ्राबाद यांना या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांना त्यांचेशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासाठी पूर्णतः सहकार्य करावे अन्यथा ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. तहसीलदार, जाफ्राबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांना संपूर्ण सहकार्य करावे.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,जालना यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-०९-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, लोकप्रश्न कार्यालय, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४४९

निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. काशिनाथ नारायण शिंदे,<br>रा. इस्लापूर ता. किनवट<br>जि.नांदेड-४३१ ८०३. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी,<br>किनवट, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी,<br>किनवट ता.किनवट, जि.नांदेड | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: सहायक वनसंरक्षक (जंकास)
किनवट,जि. नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. काशिनाथ नारायण शिंदे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सोपान मारोतीराव पोतुलवार, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लक्ष्मणराव गणपतराव जाधव, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास) किनवट जि.नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १९.९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट जि.नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि.२१.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांनी मागणी केलेली माहिती, अधिनियमातील कलम ७(९) नुसार देता येत नसल्याचे कळवून, मागणी केलेली माहिती कार्यालयात येऊन पाहण्याचे अपिलार्थीस सूचविले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.७.२००७ रोजीचे पत्र पाठविल्यापृष्ठ्यर्थ आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी हे पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचे दिसून येते, मात्र सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. सदर पत्र चुकीचे आहे, कारण या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित किती शुल्क भरावयाचे, त्यांना किती पृष्ठांची माहिती दिली आहे, याबाबत काहीही न कळविता, "माहिती अधिकार अधिनियम कलम ७/९ नुसार सदरील कालावधीची माहिती देणे शक्य नाही" असे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २४.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस एक महिन्याचे आत सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात

भरण्याचे सूचित केले, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणाऱ्या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या रु.१२,४००/- इतकी दर्शविली आहे व प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविले तथापि त्यांनी ते स्वीकारले नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस सदर शुल्क कोठे भरावयाचे याचाही तपशील कळविण्यात आल्याचे दिसून येते. जप अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलावर त्यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सुरुवातीस निर्देशित केल्याप्रमाणे दि. १९.०९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या दि. २१.६.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी म्हणजे अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो बरोबर नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री वळवावी लागत असल्याची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती त्यांनी विभागीय वन अधिकारी यांच्याकडे असल्याने ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यास वेळ लागणार होता, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे होते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांनी मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे सदर अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त

झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून, त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ६(३)(एक) नुसार अनिवार्य आहे. तथापि अशी कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे व ते सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे सिध्द न झाल्याने संबंधितांवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

५. अपील मान्य करण्यात येत आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काशिनाथ नारायण शिंदे, मु.पो.इस्लापूर, ता. किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, शिवाजी चौक, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (जंकास), शिवाजी चौक, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४५०

निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

१ श्री. संदिप नारायण कदम, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तलाठी सजा पिंगळी,(पिंगळी रेल्वेस्टेशन)
ता.जि.परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. जयराम सिताराम पवार, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पिंगळी (पिंगळी रेल्वेस्टेशन) ता.जि.परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. संदिप नारायणराव कदम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १९.९.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाचे विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी

यांच्याकडे दि. १३.०७.२००७ रोजी काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.८.२००७ रोजी घेऊन अपिलार्थीस संपूर्ण माहिती पोस्टाद्वारे विनामूल्य पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीने या प्रकरणी दि. १३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. पिंगळी ता.जि.परभणी येथील गट क्र.४९ मधील मंजुर झालेला फेरफार क्र.४५९३ चा ०.३५ आर. जमीनीचा सातबारा, फेरफार,होल्डींग व नकाशा ई.कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. ही कागदपत्रे त्यांनी पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून फेरफाराची प्रत घेतली परंतु ७/१२ चा उतारा व ८(अ)चे अभिलेखे घेतले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती पोस्टाद्वारे पाठविण्याचे सूचित केले होते. तद्नंतरअपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीने ही माहिती प्राप्त झाल्याचे राज्य माहिती आयोगास त्यांच्याकडील दि. २६.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. याच पत्रामध्ये त्यांनी त्यांची फाईल बंद करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना हवी तशी (पोष्टाने) मिळाली असल्याचे दिसून येते. ही माहिती प्राप्त होण्याअगोदर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले होते. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. हे सर्व मुद्दे पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलावर कोणताही निर्णय देणे बाकी राहिल्याचे दिसून येत नाही. सबब अपिलार्थीचे

आयोगाकडे केलेले द्वितीय अपील क्र. १४५०/२००७ फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

७. अपील क्र. १४५०/२००७ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदिव नारायणराव कदम, आचार्य नगर, जागृती हनुमानमंदिराच्या पाठीमागे, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पिंगळी ता. जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७०

निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपिलार्थी
रा.मंगळवारा बाजार मु.पो.ता.जि.हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
वरळी, मुंबई.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन
संचालनालय, वरळी, मुंबई.

त्रयस्थ पक्षः श्री.ए.एच.अग्रवाल,
उपअभियंता, नगरपरिषद,
हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संतोष यल्हाजी बांगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. संतोष पंढरीनाथ देहेस्कर, जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे श्री. विठ्ठल दिगंबरराव डाके,मुख्याधिकारी नगरपरिषद, हिंगोली यांच्यासह हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई (यापुढे त्यांना

जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. ए.एच.अग्रवाल (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.१०.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. ए.एच.अग्रवाल, उपअभियंता, हिंगोली यांना कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देण्यात आली या संदर्भात त्यांनी काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती अपिलार्थीने उपसंचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपसंचालक कार्यालयाकडे नव्हती. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे नसल्याने ही माहिती नगर पालिका, हिंगोली यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १३.९.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हिंगोली नगर परिषदेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. सुनावणी झाल्यापासून ते आदेश पारित करण्यापर्यंतच्या कालावधीमध्ये, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील विहित मुदतीत माहिती न झाल्याने, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दि. २८.०६.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला दि. १३.९.२००७ रोजीचा निर्णय मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात हिंगोली नगर परिषदेच्या ताब्यात असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीनुसार मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली यांच्याकडे सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठवून, त्यांची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १३.९.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, सदर निर्णय आयोगास योग्य वाटतो व या निर्णयामध्ये कोणताही फेरफार करण्याची आयोगास आता आवश्यकता वाटत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी झालेल्या विलंबासाठी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्यासाठी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी जास्त भर दिला आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी यापूर्वीच व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या दि. १०.१.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास दि. ७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये

प्रथम प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर दिला आहे एवढेच नव्हेतर, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलावरील आदेशामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केले होते. तथापि सदर आदेशाचे पालन त्यांनी केले नाही. अशाप्रकारे या प्रकरणी त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे,सबब संचालक, नगर पालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची दि. ११.५.२००७ रोजी सुनावणी होऊन त्यासंबंधीचे आदेश दि. १३.९.२००७ रोजी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारची कार्यवाही जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करुन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला व त्याद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. याची सचिव (नगर विकास) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांना, उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष यल्लाजी बांगर, रा.मंगळवारा बाजार,हिंगोली

२ मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी उपसंचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखालवाला मार्ग, वरळी, मुंबई, ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७१
निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

१ श्री. देशमुख महमंद हारुण अमिन मियाँ, : अपिलार्थी
रा.सिल्लोड, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, खातुन गर्ल्स उर्दू डि.एड.
कॉलेज,पटकिनारा आयशा नगर, मालेगाव
जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक.

त्रयस्थ पक्षः श्री. कुरेशी खालीक अ.अजिज

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. देशमुख महमंद हारुण अमिन मियाँ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शकील अहमद,कार्यालयीन अधीक्षक जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, खातुन गर्ल्स उर्दू डी.एड. कॉलेज,मालेगाव जि.नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शिवाजी देवराम पाटील, शिक्षण उपनिरीक्षक,जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक यांचे प्रतिनिधी(यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर त्रयस्थ पक्ष कुरेशी खालीक अ.अजिज (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे केलेले दि. २७.१०.२००६ रोजीचे द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. ९.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये श्री. कुरेशी खालीक अ.अजिज या शिक्षकाशी संबंधित जानेवारी, २००१ ते डिसेंबर, २००५ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती, संबंधित त्रयस्थ पक्ष त्यांच्याकडे कार्यरत नसल्याने, देऊ शकत नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादापूर्वी संस्थेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ४.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांची संस्था अल्पसंख्याक व खाजगी संस्था असल्याने त्यांना 'माहिती अधिकार' लागू होत नाही, असे कळविले होते. या दोन पत्रांपैकी अपिलार्थीस दि. ४.९.२००६ चे पत्र प्राप्त झाले परंतु त्यांच्या खातुन गर्ल्स/बॉईज उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन या अध्यापक विद्यालयात 'श्री. खालीद अ.अजीज कुरैशी' शिक्षक म्हणून कार्यरत नसल्याचे कथित दि. १२.९.२००६ चे पत्र त्यांना प्राप्त झालेले नसल्याचे, अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये स्पष्ट केले. संस्थेच्या प्राचार्यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. १८.०९.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता दि. ६.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये संबंधित संस्थेचे सचिव/अध्यक्ष हे जन अपिलीय अधिकारी असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांच्याकडे प्रथम अपील करण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थी यांनी संबंधित संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांच्याकडे प्रथम अपील न करता सरळ वर निर्देशित केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. शिक्षण उपसंचालक यांनी अपिलार्थीस लिहिलेले दि. ६.१०.२००६ रोजीचे पत्र चुकीचे असल्याचे आढळून येते. कारण या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केली आहे, ते प्राधिकरण म्हणजे "डी.एड कॉलेज" हेआहे. शिक्षण संचालनालयाने संस्थेच्या सचिवांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यासंबंधीच्या केलेल्या सूचना डी.एड. कॉलेजेसना लागू होतात किंवा कसे हे आयोगास शिक्षण विभागाचे उपस्थित प्रतिनिधी स्पष्टपणे सांगू शकले नाहीत. सबब शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. १८.९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, प्रथम अपिलास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करण्यात येऊन, हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन तद्नंतर सात दिवसांच्या आत आपले आदेश पारित करावेत. जर ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसतील, तर संबंधित प्राधिकरणातील संबंधित, ज्यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेणे शिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार अभिप्रेत आहे, अशा प्राधिकरणाकडे अपिलार्थीचे प्रथम अपील पाठवून त्याबाबतची सुनावणी हे आदेश निर्गमित होताच ४५ दिवसांच्या आत होईल, असे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग,नाशिक यांनी अपिलार्थीच्या दि. १८.९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, प्रथम अपिलास होणारा संभाव्य विलंब क्षमापित करण्यात येऊन, हे आदेश

निर्गमित होताच एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन तद्नंतर सात दिवसांच्या आत आपले आदेश पारित करावेत. जर ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसतील, तर संबंधित प्राधिकरणाशी संबंधित, ज्यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेणे शिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार अभिप्रेत आहे, अशा प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाठवून त्याबाबतची सुनावणी हे आदेश निर्गमित होताच ४५ दिवसांच्या आत होईल, असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख महंमद हारुण अमिन मियॉ, न्यु देशमुख मेडिकल स्टोअर्स, सराफा मार्केट सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, खातुन गर्ल्स उर्दू डि.एड. कॉलेज,पटकिनारा आयशा नगर, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७२

निर्णय दिनांक : ०१-०९-२००८

१ श्री. सूर्यकांत काशिनाथ सगर, : अपिलार्थी
मु.पो.वलांडी, ता.देवणी जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय,
वलांडी, ता. देवणी, जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, देवणी
जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सूर्यकांत काशिनाथ सगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) श्री. शिवाजी नारायणराव धनेगावे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, वलांडी, ता.देवणी जि.लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) श्री. नितीन शेषराव दाताळ, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी जि.लातूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.११.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांचेकडील दि. १५.०२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ.वलांडी ता.देवणी जि. लातूर येथील गावठाण भूखंड वाटपाबाबत व सर्वे नं.११८ मधील प्लॉटसंबंधीची काही माहिती मागितली होती

अपिलार्थीच्या दि. १५.२.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी म्हणजे दि. १५.२.२००६ रोजी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत काही माहिती दिली, तथापि सदर माहिती अर्धवट असल्याचे वाटल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.०३.२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वर उल्लेखिल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीच्या दि. १५.२.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने, त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाचा भंग झाल्याचे आढळून येत नाही, मात्र या अर्जाच्या अनुषंगाने, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व अर्धवट असल्याचे म्हटले आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची कशी आहे, याचे पुरेपूर विवेचन राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ आयोगास त्यांनी एकाच विषयावर दोन वेगवेगळया ठरावाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्याचे

दाखविले. त्यापैकी एका ठरावावर 'सत्यवती चंद्रशेखर महाजन' यांची सही असून याच विषयावरील दुसऱ्या ठरावावर 'चंद्रशेखर सरस्वती महाजन' यांची सही आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने ग्रामपंचायतीच्या दि.२३.४.२००१ रोजी सकाळी ११.०० वा घेतलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत देखील अशाचप्रकारचे मुद्दे उपस्थित केले असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, या इतिवृत्तामध्ये "दि. २३.४.२००१ रोजी सकाळी ११.०० वा ग्राम पंचायत कार्यालयात मासिक सभा ठेवलेली होती, तथापि कोरमअभावी ही सभा ११.०० नंतर दुपारी घेण्यात आली." अशी नोंद आहे. सभा तहकुब झाल्याचे इतिवृत्त नोंदवितांना त्यामध्ये, "पुढील सभा दि.---- रोजी ठेवण्यात आली." असे नमूद केलेले आहे. यामध्ये दिनांकाचा उल्लेख नसल्याने ही माहिती चुकीची आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तथापि याच इतिवृत्तांतामध्ये 'तहकुब झालेली सभा ठीक ११.०० वाजता सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली घेऊन खालील विषयावर चर्चा करण्यात आली' असे म्हटले आहे. यावरुन असे दिसून येते की, संबंधित ग्रामसेवकाने या सभेचे इतिवृत्त चुकीचे लिहिलेले आहे. यामध्ये १ल्या परिच्छेदामध्ये ११.०० ची बैठक तहकुब करण्यात आली, असे नमूद केलेले आहे तर त्यापुढे लागलीच तहकुब झालेली सभा ११.०० वा. घेण्यात आली असे म्हटले आहे. यामध्ये दिनांकाचा उल्लेख नाही. अर्थात, माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अपिलार्थीस देणे, अभिप्रेत आहे, यामध्ये जन माहिती अधिकारी यांची कोणतीही चूक नाही अथवा त्यांनी ही माहिती अपिलार्थीस मुद्दाम चुकीची दिल्याचे दिसून येत नाही. सदरचे इतिवृत्त लिहिलेल्या संबंधित ग्रामसेवकाने चूक केल्याने, आवश्यक वाटल्यास, त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना या मुद्यांवर सूचविण्यात

येत आहे. मात्र अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी एकाच विषयावर प्राप्त झालेल्या दोन ठरावाच्या प्रतींवर वेगवेगळया ग्रामस्थांच्या सहया असल्याने ही माहिती अपिलार्थीस संबंधित ग्रामसेवकाने चुकीची दिली असल्याचे दिसून येते.

उपरोक्त त्रूटी पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस चुकीची माहिती मिळण्यासाठी संबंधित ग्रामसेवक हेच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित ग्रामसेवकाने दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील नितांत सचोटीच्या अभावाबद्दल, त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे. संबंधित ग्रामसेवक यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे निश्चितपणे सिध्द होत आहे. सबब त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली अचूक माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवकाने दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील नितांत

सचोटीच्या अभावाबद्दल, त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-०९-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यकांत काशिनाथ सगर, रा.वलांडी ता.देवणी जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, वलांडी, ता.देवणी जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७३

निर्णय दिनांक ०२-०९-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुनिल विनायकराव मगर,<br>राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड,<br>कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा. प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्रीमती ए. एस. भालेराव, नायब तहसीलदार (नगरपालिका प्रशासन), जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) ह्या हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुनिल विनायकराव मगर व जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १०-०४-२००७ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जय हनुमान मंदिर ट्रस्टला २००६ मध्ये दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राविषयी काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०८-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी म्हणजे दिनांक ०८-०३-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. अपिलार्थीचे अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले.

अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीस जय हनुमान सार्वजनिक मंदिर ट्रस्ट स्थापन करण्याकरिता नगरपरिषदेचे नाहरकत प्रमाणपत्र दिले. परंतु श्री. सतीश श्रीधर टोणगे यांना मारोती मंदिर सावरगाव (पु.) येथील ट्रस्ट नोंदणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र नगरपरिषद अधिका-याने ज्या शासन निर्णयाच्या आधारे नाकारले त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्या या कृतीबद्दल आक्षेप नोंदविला असून त्यांचे म्हणणे असे असल्याचे दिसून येते की, जय हनुमान मंदिर ट्रस्टकरिता जन माहिती अधिकारी यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले होते. श्री. सतीश श्रीधर टोणगे यांना मात्र मंदिर ट्रस्टकरिता नाहरकत प्रमाणपत्र दिले नाही हे दोन्ही निर्णय जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे घेतले त्याच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हव्या आहेत. यासंदर्भातील सविस्तर खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे केला आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी जय हनुमान सार्वजनिक मंदिर ट्रस्टकरिता नाहरकत प्रमाणपत्र न देण्याचे कारण म्हणजे भूमी अभिलेख कार्यालयात मंदिराची नोंद नव्हती असे दिले आहे. श्री. सतीश श्रीधर टोणगे यांनी व्यक्तीगत स्वरुपाचा अर्ज केल्याने त्यांना नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होऊ शकले नाही. अपिलार्थीने श्री. सतीश श्रीधर टोणगे यांना नाहरकत प्रमाणपत्र ज्या कारणास्तव नाकारले होते त्या कारणांची शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, सार्वजनिक प्राधिकरणातील प्रत्येक कर्मचारी कोणत्या तरी नियमातील तरतुदीअन्वये आपले कर्तव्य पार पाडत असतो त्यामुळे श्री. सतीश श्रीधर टोणगे यांना आवश्यक ते प्रमाणपत्र नाकारतांना त्यांनी निश्‍चितपणे कोणत्या तरी तरतुदींचा आधार घेऊन ही परवानगी नाकारली असावी, ही तरतूद नेमकी कोणती आहे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग ग्राह्य धरत असून, जर नगर परिषदेने अशा प्रकारच्या ट्रस्टस्‌ना नाहरकत प्रमाणपत्र देण्याविषयी जे काही धोरण ठरविले असेल त्या धोरणांची अथवा संबंधित विषयावरील ठरावाची प्रत अपिलार्थीस देणे भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. जर अशा प्रकारच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना त्यांच्याकडे उपलब्ध नसतील व त्यांनी स्वत:च्या मनाने वैयक्तिक स्वरुपात व स्तरावर असा निर्णय घेतला असेल तर त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविणे भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील

याविषयावरील टिपणीच्या प्रती देऊन त्यांना माहिती दिल्याचे दिसून येत आहे. यावरुन श्री. सतीश श्रीधर टोणगे यांनी मारोती मंदिराच्या ट्रस्टच्यातर्फे अर्ज सादर करतांना वैयक्तीकरित्या अर्ज सादर केल्याने त्यांना परवानगी नाकारण्यात आल्याचे दिसते.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या नगरपरिषदेकडे अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये काही मार्गदर्शक सूचना प्रस्तुत केल्या असतील तर त्या सुचनांची अथवा त्यांच्या वरिष्ठांचे या प्रकरणी यासंदर्भात काही मार्गदर्शन प्राप्त झाले असेल तर त्याची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०९-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल विनायकराव मगर, राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७६, १५७७, १५७८, १५७९, १५८० व १५८१

निर्णय दिनांक ०२-०९-२००८

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, : अपिलार्थी
व्दारा : ॲड जि. एस. रायबोळे,
सरस्वती कॉलनी, किनवट,
जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि
अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड (अपील क्रमांक
१५७६/२००७)

२ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि
अधिकारी कार्यालय, हदगांव, तालुका
हदगांव, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक
१५७७/२००७)

३ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि

अधिकारी कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १५७८/२००७)

४ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १५७९/२००७)

५ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १५८०/२००७)

६ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १५८१/२००७)

७ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड (अपील क्रमांक १५७६/२००७)

८ जन अपिलीय अधिकारी :

तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड (अपील
क्रमांक १५७७/२००७)

९ जन अपिलीय अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड (अपील
क्रमांक १५७८/२००७)

१० जन अपिलीय अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड (अपील
क्रमांक १५७९/२००७)

११ जन अपिलीय अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड (अपील
क्रमांक १५८०/२००७)

१२ जन अपिलीय अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड (अपील
क्रमांक १५८१/२००७)

## निर्णय

वरील सहा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. यु. जी. मॅनमवार, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, श्री. मधुकर दत्तराव सुर्यवंशी, जन

माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, श्री. विक्रम विश्वंभरराव कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकर, श्री. गंगाराम नारायण लकडे, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अर्धापूर, श्री. विश्वंभर नीळकंठ मंगनाळे, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, श्री. केशव दिगंबर पवार, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, श्री. जी. के. कौलवार, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, श्री. दामोधर नारायणराव कनकदंडे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव, श्री. पंढरी निवृतीराव गुरमे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर, श्री. विजय यशवंतराव घुगे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, श्री. अंकुश दशरथ बरडे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार व श्री. दत्तराव किशनराव तावडे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या स्वतंत्र अर्जान्वये उपरोक्त सहा जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केल्या जाणा-या जलसंधारण, कामासाठी धान्य, या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत हाती घेतल्या गेलेल्या सर्व कामांची सन २००४ ते २००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> “वरील कामावरील उपस्थित मजुरांची यादी, मजुरांचे नावा, गावासहीत यादीची छायांकीत प्रत तसेच कामावर उपस्थित मजुरांचे भरलेल्या हजेरी मस्टरच्या यादीची छायांकीत प्रत तसेच कामावर उपस्थित मजुरांना धान्य दिलेल्या स्वस्त धान्य दुकानदारांची नावा, गावासहीत माहिती देणे तसेच कुशल, अकुशल कामावर झालेल्या

खर्चाची संपुर्ण माहिती देणे, सर्व प्रकारच्या केलेल्या कामाची सद्यास्थिती काय आहे याची संपुर्ण माहिती देणे.''

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी लोहा, हदगांव, भोकर, अर्धापूर, कंधार व मुदखेड यांनी अनुक्रमे दिनाक ०४-०१-२००७, १८-१२-२००६, ०८-०१-२००७, ३०-१२-२००६, १६-१२-२००६ व ३०-१२-२००६ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला.

या प्रतिसादामध्ये तालुका कृषि अधिकारी, लोहा यांनी मंडळ कृषि अधिकारी कापसी, लोहा व सांजरखेड यांना त्यांना माहिती पुरविण्याबाबत दिनांक ०४-०१-२००७ रोजी प्रथम सूचित केले व याच पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती संकलित करण्यात येत असल्याचे कळविले व तदनंतर त्यांच्या कार्यालयातील दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस एकूण ७८८८ प्रतींसाठी रुपये १५७७६ एवढा निधी लागणार असल्याची अपिलार्थीस कल्पना देऊन हा निधी त्यांना प्राप्त होताच ही माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले व त्याचबरोबर ही माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असल्याने ती तपासणीकरिता उपलब्ध असल्याचे देखिल अपिलार्थीस कळविले.

तालुका कृषि अधिकारी, हदगांव यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, परंतु आवश्यक त्या अनुदानाच्या अनुपलब्धतेमुळे ही माहिती त्यांना देता येत नसल्याचे कळविले व अंतिमतः अपिलार्थीस दिनाक १०-०५-२००७ रोजी एकूण ५५ पृष्ठांची माहिती पुरविली.

तालुका कृषि अधिकारी, भोकर यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता त्यांच्या

कार्यालयात माहिती उपलब्ध असल्याचे कळविले व दिनाक १५-०१-२००७ रोजी कामासाठी धान्य योजनेची माहिती अपिलार्थीस पाठविली.

तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे निरंक माहिती असल्याचे कळविले.

तालुका कृषि अधिकारी, कंधार यानी अपिलार्थीच्या दारिद्ररेषेखालील प्रमाणपत्राबाबत आक्षेप घेऊन अपिलार्थीकडून नवीन प्रमाणपत्राची मागणी केली व सदर प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास रुपये २१८०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

तालुका कृषि अधिकारी, मुदखेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जास दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, वरील सर्व जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी स्वतंत्ररित्या वेगवेगळी प्रथम अपीले केली.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर एकाही जन अपिलीय अधिका-याने निश्चित स्वरुपाचा निर्णय पारित केला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी लोहा, हदगांव, भोकर यांनी या अपिलावर सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढून त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी हदगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये एकूण ५५ पृष्ठांची माहिती दिली. सदर माहिती अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगाकडे पुरावा सादर केला. यावरुन

अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी, अर्धापूर यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. मात्र कामासाठी धान्य या योजनेची माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली. जन अपिलीय अधिकारी, कंधार यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी, मुदखेड यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे अवगत करुन पुनःश्च तीच माहिती दिनांक २४-०१-२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी एकूण सहा स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली. या अपील अर्जांमध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय दिला नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जांमधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी लोहा यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांना देण्यासाठी एकूण ७८८८ इतक्या पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागणार होत्या व त्यासाठी आवश्यक ते अनुदान त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हते, मात्र अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती, ती माहिती अंतिमतः आता दिनांक २१-०५-२००७ रोजी दिली असून अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याची पोच त्यांनी आयोगासमोर दाखविली.

जन माहिती अधिकारी हदगांव यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ५५ पृष्ठांची माहिती दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी भोकर यांच्यातर्फे अशाच प्रकारचा युक्तिवाद आयोगासमोर करण्यात आला. त्यांनी देखिल अपिलार्थीस दिनांक १५-०१-२००७ रोजी कामासाठी धान्य योजनेची माहिती पाठविली व उर्वरित माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ती ३ दिवसात अपिलार्थीस देण्यासाठी ते तयार असल्याचे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी अर्धापूर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या योजने अंतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणतेही काम न झाल्याने ती माहिती निरंक असल्याचे कळविले. दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मंडळ कृषि अधिकारी श्री. बारड यांचे अंतर्गत कामासाठी धान्य योजने अंतर्गतची माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी कंधार यांनी त्यांना अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राबाबत त्यांचा आक्षेप असल्याचे आयोगास अवगत केले, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी मुदखेड यांच्यातर्फे, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ३०-१२-२००६ रोजी पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले.

सर्व जन अपिलीय अधिकारी (कंधार, अर्धापूर व मुदखेड वगळता) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही, असे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस सर्व जन माहिती अधिका-यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे.  यापैकी कोणाही जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नाकारले नाही.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत असल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी काही जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नव्हता, त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती प्रत्यक्षात पुरवू शकले नव्हते, तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडे तयार असल्याचे कळवून ही माहिती तपासणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली.  या जन माहिती अधिका-यांपैकी कृषि अधिकारी, अर्धापूर व मुदखेड यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत तर कृषि अधिकारी लोहा व हदगांव यांनी विहित मुदतीनंतर योग्य ती माहिती पुरविल्याचे दिसून येते तर जन माहिती अधिकारी भोकर आणि कंधार यांच्याकडे माहिती तयार असून त्यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत देण्याची तयारी आयोगासमोर दर्शविली आहे.  जन माहिती अधिकारी कंधार यांनी अपिलार्थीच्या दारिद्र्रेषेखालील प्रमाणपत्राबाबत आक्षेप घेऊन अपिलार्थीस चालू वर्षाचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र मागितले अन्यथा माहितीसाठी रुपये २१८०० इतके शुल्क भरण्याचे कळविले.  जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिला नाही.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राबाबत घेतलेल्या चुकीच्या आक्षेपाशी आयोग सहमत होऊ शकत नाही, कारण दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र हे काही ठराविक कालावधीनंतरच लाभार्थ्यांना देण्यात येते.  दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र दरवर्षी संबंधितांना देण्याची पध्दती राज्य शासनाच्या कोणत्याही संबंधित यंत्रणेमध्ये प्रचलीत नाही, त्यामुळे आता संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देणे भाग आहे.

उपरोक्त प्रकरणात असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी लागणारे आवश्यक ते अनुदान जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हते व त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती त्यांना वेळेत पुरविता आली नाही, मात्र त्यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयात तयार ठेवली होती. जन माहिती अधिकारी कंधार वगळता उर्वरित जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती पुरविली आहे तर जन माहिती अधिकारी भोकर यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याची तयारी आज आयोगासोर दर्शविली आहे. जन माहिती अधिकारी कंधार यांनी अपिलार्थीच्या अर्जावर घेतलेला आक्षेप चुकीचा आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी भोकर व कंधार यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी कोणत्याही जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र या सर्व प्रकरणातील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य योग्य रितीने पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. केवळ अपिलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले म्हणून काही जन अपिलीय अधिका-यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले तर जन अपिलीय अधिकारी, अर्धापूर, कंधार व मुदखेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता व या संदर्भातील आपले कोणतेही निर्णय पारित न करुन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. आयुक्त (कृषि), पुणे यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपील अंशत: मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १५७६/०७, १५७७/०७, १५७८/०७, १५७९/०७, १५८०/०७ व १५८१/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी, भोकर व कंधार यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०९-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, ॲड जि. एस. रायबोळे, सरस्वती कॉलनी, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, तालुका

मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५३

निर्णय दिनांक ०२-०९-२००८

१ श्री. मोहमद अन्वरउल्लाखान पिता : अपिलार्थी
बरकतउल्लाखान,
९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्,
नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहमद अन्वरउल्लाखान पिता बरकतउल्लाखान, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. धोंडगे अविनाश त्र्यंबकराव, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित २००५-२००६ व २००६-२००७ (अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत) या कालावधीतील कमी दराने स्वीकृत केलेल्या निविदासंदर्भात एकूण दोन मुद्दयांवर माहिती मागितली होती. या माहितीमध्ये कमी तांत्रिक मान्यतेच्या प्रती व कमी दराने स्वीकृत केलेल्या निविदावरील रक्कम वाढ झाली असल्यास या वाढीची कारणे या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस या मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील क्रमांक ४९७७ दिनाक १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे अपिलार्थीस कळविले.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, कमी खर्चाच्या निविदा स्वीकृत करण्यापोटी झालेल्या जास्तीच्या खर्चाची कारणे अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली नाहीत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीस ही माहिती दिली गेली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अथवा त्यांच्या अपिलावर कोणत्याही प्रकारे निर्णय पारित न करता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली परिपूर्ण माहिती त्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याविषयी जन माहिती

अधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक ०९-११-२००६ रोजीच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती निरंक समजावी व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना उपविभागाकडून प्राप्त होताच सादर करण्यात येईल, असे कळविले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. असे जन माहिती अधिकारी यांनी कळवून देखिल आजपावेतो अपिलार्थीस ही कारणे त्यांनी न कळविल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्यापपर्यंत प्राप्त झालेली माहिती अपूर्ण ठरत आहे.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती (जादा खर्चाचे पृथःकरण) १५ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसते, त्यांना सदर माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित कर्मचारी / सहाय्यक अधिका-यांकडून गोळा करुन नंतर ती अपिलार्थीस पुरवावयाची असते असा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आज केलेला युक्तिवाद व त्याचबरोबर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केलेली त्यांची कार्यालयीन पध्दती पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे संबंधित सहाय्यक कर्मचारी / अधिकारी या प्रकरणी जबाबदार ठरत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी नियुक्त केलेले, जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीव्दारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना वर निर्देशित केलेल्या संबंधित जन माहिती अधिका-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली आहे तर मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली हा अपिलार्थीचा युक्तिवाद वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे आयोग मान्य करीत आहे व संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०९-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद अन्वरउल्लाखान पिता बरकतउल्लाखान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्, नांदेड.
२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५४

निर्णय दिनांक ०२-०९-२००८

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड,
जिल्हा जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, जळगांव

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सौ. वंदना अविनाश मोरे, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, जळगांव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रशांत शालीग्राम भामरे, जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य

कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल व त्रयस्थ पक्ष श्री. नारायण गजानन कान्हे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०६-०१-२००४ रोजी जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे केलेल्या अपील अर्जाबाबतची बोदवड येथील गट नंबर १७४ च्या रस्त्यालगतची माहिती एकूण १२ मुद्दयांव्दारे मागितली होती. या माहितीचा कालावधी त्यांनी माहिती जेव्हापासून उपलब्ध असेल तेव्हापासून ३१-०७-२००६ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक ३, ४, ५, ६, ११ व १२ शी संबंधित माहिती वगळता, उर्वरित माहिती अपिलार्थीस दिली. मुद्दा क्रमांक ३ ते ६ व ११ आणि १२ या मुद्दयांशी संबंधित माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २६-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २६-०९-२००६ रोजी पारित केले. या आदेशासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित असे कोणतेही आदेश पारित न करता या सुनावणीमध्ये अपिलार्थीच्या अर्जातील प्रत्येक मुद्दयावर मुद्देनिहाय चर्चा करण्यात

आली व पुढील कारवाईबाबत सामनेवाला यांना आदेशित केले.  अपील अर्जदार यांचे पूर्णतः समाधान झाले आहे असा निष्कर्ष या निर्णयामध्ये त्यांनी शेवटी काढला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न देता माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे व त्यांची दिशाभूल केली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून खरी माहिती अपेक्षिली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.  त्यांनी आयोगाकडे त्यांचे म्हणणे फॅक्सव्दारे पाठविले असून, यामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.  या फॅक्स संदेशामध्ये त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीचा पुनरुच्चार करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खरी वास्तविक व पूर्ण माहिती द्यावी, जन माहिती अधिकारी यांना खरी व वास्तविक माहिती देण्याचे आदेशित करण्याची, एकाच प्राधिकरणाशी संबंधित माहिती असतांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने या सर्व प्रकरणात त्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास झाला असल्याने त्याची नुकसानभरपाई मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक २२-०८-२००६ रोजी अपिलार्थीच्या अर्जातील ६ मुद्दे वगळता, उर्वरित मुद्दयांवरील माहिती दिली होती, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती दिनांक १८-१०-२००६ रोजी दिली आहे.  सदर माहिती त्यांनी बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेऊन दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विचारणा केलेल्या एकूण १२ मुद्दयांपैकी काही मुद्दयांवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद यांनी दिनांक २२-०८-२००६ रोजी माहिती दिली तर कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम यांनी मुद्दा क्रमांक ३, ६, ९ व ११ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००६ रोजी दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४, ५ व १२ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थी हे याच विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार माहिती मागवित असतात. अपिलार्थीच्या गोडाऊन शेजारी जाणा-या रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणाबाबतची अशा प्रकारची माहिती ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून वारंवार मागवित असतात. प्रत्येक वेळी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अपिलार्थीस कळवित असतात. वास्तविक पाहता जिल्हा परिषद बांधकाम विभाग व जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग हे एकाच जिल्हा परिषदेचे व पर्यायाने एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्याने या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयांची एकत्रित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देणे सोईस्कर होईल असे आयोगास वाटते. अपिलार्थीने निर्देशित केलेल्या जागेवरील अतिक्रमणासंदर्भात न्यायालयात वाद चालू असून या अतिक्रमणाबाबत न्यायालयाच्या निर्णयानंतर अंतिम निर्णय घेणे शक्य होईल असे आज जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

अपिलार्थीचे जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान होणार नसेल तर त्यांनी या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व

नस्त्यांची पाहणीची मागणी करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या सर्व मुद्दयांची एकत्रित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील सर्व अभिलेख्यांच्या तपासणीची मागणी अपिलार्थीने केल्यास त्यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेखे तपासणीसाठी याच कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्यावीत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना ही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही अशा प्रकारची विधाने केली आहेत ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदींचे अवलोकन करता चुकीची असल्याचे आढळून येईल.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेख्यांची तपासणीची मागणी अपिलार्थीने केल्यास त्यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व अभिलेख्यांच्या नस्त्या तपासणीसाठी त्यांना उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०२-०९-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. मेन रोड, बोदवड, तालुका बोदवड, जिल्हा जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा. पं.), जिल्हा परिषद, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील क्र.१५८९ ते १६५२ (एकूण ६४ अपिले)**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८९ ते १६५२

निर्णय दिनांक : ०४-०९-२००८

१ सौ. प्रमिलाबाई अण्णासाहेब चव्हाण, : अपिलार्थी
व्ही-जी-३६,विष्णूनगर, आकाशवाणीमागे व
इतर ६३ (सोबतच्या यादीप्रमाणे )

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता, नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त, महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक,
नगररचना (मूल्यांकन),
महानगरपालिका, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. प्रमिलाबाई अण्णासाहेब चव्हाण व सोबतच्या यादीप्रमाणे इतर ६३ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. महेमुद मौला खान, शाखा अभियंता, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुधाकर नारायण भंडारी, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना (मूल्यांकन) महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि. १६.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील हॉटेल डार्लींग ते सेव्हन हील या रस्त्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) नगर रचनेचा १९७२ ते २००५ पर्यंतच्या हॉटेल डार्लींग ते सेव्हन हिल (गजानन महाराज मंदीर रोड) पर्यंत झालेल्या रस्ता आराखडयाचे नकाशे.

२) वेळोवेळी झालेल्या बदल संबंधीचे आक्षेप, ठराव व शासनाची मिळालेली मान्यता संबंधीचे छायांकीत प्रती.

३) तसेच वर्तमान पत्रात वरीत संबंधाची दिलेली प्रगटणे व राजपत्राच्या प्रती व यापुर्वी बाधीत घर धारकांना दिलेल्या नोटीसांची नमुन्यादाखल १० प्लॉट धारकांचे नोटीसी."

सर्व अपिलार्थी यांनी ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थींच्या या अर्जांपैकी जन माहिती अधिकारी यांनी एकूण सहा अपिलार्थींना (सोबतच्या यादीतील अनुक्रमांक ११,१५,२८,४०,४२ व ४६) दि. १७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे प्रथम प्रतिसाद दिला आहे.

"उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये आपण हॉटेल डार्लींग ते सेव्हन हील (गजानन महाराज मंदिर रोड) पर्यंत झालेल्या रस्ता आराखडया संबंधीची माहिती अपेक्षिलेली आहे.

या कार्यालया अंतर्गत आवश्यक शुल्काचा भरणा करुन विकास योजना भाग नकाशा पूरविण्यात येतो त्यानूसार आपण आवश्यक शुल्क भरुन विकास योजना भाग नकाशा उपलब्ध करुन घ्यावा."

उर्वरित काही अपिलार्थींना त्यांच्याकडील दि. २६.१२.२००७, २.१.२००८ व ३.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये " उपरोक्त विषयी संदर्भ पत्र क्रमांक २ अन्वये आवश्यक शुल्क भरणा करणेबाबत आपणास कळविण्यात आले आहे. त्यानूसार आपण मूळ अर्ज व अपिलअर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती देण्यात येत असून, कार्यालयात खालीलप्रमाणे शुल्क जमा करुन नकाशे उपलब्ध करुन घेण्यात यावे.

सबब आपणास कळविण्यात येते की,

०१. आरेखन कक्षात सन १९७५ व २००२ चा नकाशा उपलब्ध आहे. त्यासाठी प्रत्येकी रुपये ७००/- असे एकुण १४००/- चा भरणा करावा तद् नंतर उपरोक्त नकाशा पुरविण्यात येईल.

०२. वेळोवेळी सन २००२ च्या नकाशामध्ये कुठलाही बदल झालेला नाही, त्यामुळे बदलासंबंधीचे आक्षेप ठराव व शासनाची मिळालेली मान्यता याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

०३. वर्तमान पत्रात वरील मुद्दा क्रमांक २ बाबत दिलेली प्रगटणे व राजपत्राच्या प्रती याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व सदर रस्त्याने बाधीत घर मालकांना कुठलाही नोटीस देण्यात आलेल्या नाहीत. तसेच महानगरपालिकेतर्फे कुठल्याही प्रकारे रस्त्याची मार्किंग/आखणी करुन देण्यात आलेली नाही."

असा प्रतिसाद दिला आहे.

यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी एकूण ६४ अपिलार्थींपैकी सहा अपिलार्थींना दि. १७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून उर्वरित काही अपिलार्थींना त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने सर्व अपिलार्थींनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७, १२.१२.२००७ व १५.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थींच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा त्यांच्याशी या संदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी एकूण ६४ स्वतंत्र द्वितीय अपीले दाखल केली आहेत. या अपील अर्जांमध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अयोग्य व दिशाभूल करणारे पत्र प्राप्त झाले असून, या माहितीपोटी लावण्यात आलेले शुल्क अवास्तव असल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सर्व अपिलार्थी यांच्यातर्फे 'सुधारीत डि.पी.रोड हटाव कृती समिती अरिहंतनगर-विष्णूनगर, VG-३९ विष्णूनगर,औरंगाबाद' या नावाच्या कृतीसमितीतर्फे, कृतीसमितीचे सचिव श्री. त्रिंबक सांडू काथार वाणी व अध्यक्ष श्री. रतन मोतीरामजी कुचे यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून मागितलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झालेली नाही. ही माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ त्यांनी ज्या-ज्यावेळी महानगरपालिकेकडे अर्ज केला, त्या-त्यावेळी त्यांना त्रास देण्यात आला. त्यांच्या मूळ माहितीचे अर्ज स्वीकारण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कर्मचाऱ्यांची नेमणूक केली गेलेली नाही. अर्ज वैयक्तिकरित्या संबंधितांकडे देऊ केले असता,त्यांनी ते स्वीकारण्यास नकार दिला. शेवटी त्यांना सदर अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावे लागले, यासाठी त्यांना नाहक भुर्दंड सोसावा लागला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१,१३,०००/- इतके व वैयक्तिक अपिलार्थीकडून रु.१४००/- इतके अशा अवास्तव शुल्काची मागणी केली. त्यांनी ज्या रस्त्याविषयी माहिती मागविली आहे. त्या रस्त्याच्या बांधकामाने त्यांची सध्याची निवासस्थाने बाधित होत असून त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थींना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवून, शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे कळविले. तथापि त्यांच्यापैकी कोणीही शुल्काचा भरणा केला नाही, त्यामुळे त्यांना आजतागायत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. कोणतीही विकास योजना मंजूर करताना त्यावेळी घेतले गेलेले आक्षेप हे राज्य शासनाकडे उपलब्ध असतात. विकास योजनेचा नकाशा तयार करताना राज्य शासनातर्फे प्रत्येक महानगरपालिकेत 'विकास योजना विशेष घटक' या नावाच्या घटक कार्यालयाची स्थापना केली जाते. या घटकाकडे सर्व संबंधितांचे आक्षेप नोंदविलेले असतात.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थींचे अपील अर्ज त्याच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थींच्या प्रथम अपील अर्जांवर त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. आयोगाकडील सुनावणीची नोटीस त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने अपील केल्याचे त्यांना ज्ञात झाले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, सर्व अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.१०.२००७ रोजी त्यांच्या वस्तीशी संबंधित हॉटेल डार्लींग ते सेव्हनहील पर्यंतच्या नियोजित रस्त्यासंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नकाशावरुन, असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या रस्त्यासंदर्भात माहिती मागितली आहे, तो रस्ता बहुतांशी प्रस्तावित रस्ता आहे. या रस्त्याचे अद्यापपावेतो पूर्ण बांधकाम झालेले नाही. या रस्त्याचे हॉटेल डार्लींग ते रमानगर स्मशानभूमी या भागातील ३०० मीटर लांबीचे काम झाले असून उर्वरित रस्ता आज रोजी अस्तित्त्वात नाही. नियोजित रस्ता औरंगाबाद-जालना या ४५ मीटर रुंदीच्या राज्य महामार्गाला समांतर असा प्रस्तावित आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व अपिलार्थी यांच्यातर्फे हा डी.पी. रोड रद्द करावा, सर्व बाधित नागरिकांना बेघर करु नये व उघडयावर आणू नये, असे लेखी निवेदन आयोगास दिले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी असेही म्हटले आहे की, महानगरपालिकेकडे झालेल्या कामांची बीले देण्यासाठी पैसे नसताना, अशास्थितीत महानगरपालिका हा रोड त्यांच्यावर लादून महानगरपालिका स्वतःवर पैशाचा बोजा का वाढवत आहे, त्यांच्या, या विनंती संदर्भात त्यांनी आयोगाचे आदेश अपेक्षिले आहेत.

आयोगाची कार्यकक्षा पाहिली असता, अपिलार्थींच्या या विनंतीवर विचार करणे हे राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेबाहेर आहे, असे आयोगास वाटते. त्यामुळे अपिलार्थींनी केलेल्या या विनंतीवर राज्य माहिती आयोग कोणतेही आदेश देऊ शकत नाही, असे अपिलार्थींच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सर्व अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेला प्रतिसाद पाहता, अपिलार्थींच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उशिरात उशिरा दि. १५.११.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी एकूण ६४ अपिलार्थींपैकी सहा अपिलार्थींना दि. १७.११.२००७ रोजी प्रतिसाद दिला आहे, तर उर्वरित अपिलार्थींना वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दि. २६.१२.२००७ ते ३.१.२००८ या कालावधीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाचे वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, औरंगाबाद महानगरपालिकेचा आजपर्यंत सन १९७१ व २००२ मध्ये अशा दोन वेळी विकास आराखडा मंजूर झाला होता. सर्व अपिलार्थींनी त्यांना १९७१ च्या विकास योजनेच्या प्रती अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले. त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांच्या हातून जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना १९७२ हे साल चुकीने लिहिले असून ते १९७१ असे वाचावे. अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तसेच अधिनियमाद्वारे अपिलार्थींच्या प्रथम माहितीच्या अर्जास प्रतिसाद देण्याची विहित केलेली मुदत आता व्यपगत झाल्यामुळे, आता ही माहिती अपिलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थींना मूळ अर्जातील मंजूर रस्त्याच्या आराखडयाची २००२ ची मंजूर योजनेतील नकाशाची प्रत उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दाखविली. त्यावर अस्तित्त्वात असलेला रस्ता व प्रस्तावित रस्ता असे दोन्ही भाग वेगवेगळया रंगात दाखविण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. या दोन्ही वेळच्या नकाशांच्या प्रतींसोबत या विकास योजनेस ज्या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात आली त्या ठरावाची प्रत, दोन्ही विकास योजनांना राज्य शासनाने दिलेल्या मंजूरीच्या प्रती, विकास योजनेची कार्यवाही सुरु करण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर राज्य

शासनाने पारित केलेल्या अधिसूचनेच्या प्रती अपिलार्थी यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. विकास योजना मंजूर करत असताना वर्तमानपत्रातील जाहीर प्रगटनाच्या प्रतींचा देखील या माहितीमध्ये समावेश आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मध्ये बाधित घरधारकांना दिलेल्या नोटीसची नमुन्यादाखल प्रती मागितल्या होत्या, तथापि अशाप्रकारची कार्यवाही मनपाकडून अद्यापपावेतो झाली नसल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सबब ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांना देय होत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी सर्व अपिलार्थींना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती (मुद्दा क्र. ३ मधील घरधारकांना दिलेल्या नोटीसच्या प्रती वगळता) हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत स्पष्ट व वाचनीय स्वरुपात विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी आज रोजी आयोगापुढील सुनावणीमध्ये त्यांना महानगरपालिका कार्यालयाकडून कोणतीही माहिती मागितली असता त्रास होतो, त्यांना संबंधित कर्मचाऱ्यांकडून नीट उत्तरे मिळत नाहीत व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सकारात्मक दृष्टीकोन ठेवून केली जात नाही, अशा अर्थाची तक्रार आयोगाकडे केली आहे. आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी सर्व नागरिकांना त्यांच्या कार्यालयातील

कर्मचाऱ्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेली माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या सूचना त्यांच्या पातळीवरुन त्वरित पारित कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १५८९/०७ ते १६५२/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील (मुद्दा क्र. ३ मधील काही भाग वगळता) उर्वरित संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. प्रमिलाबाई अण्णासाहेब चव्हाण व ईतर ६३, (सोबतच्या यादीप्रमाणे)

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना (मुल्यांकन) महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी सुनावणीशी संबंधित अपिलार्थीची यादी

| अ. क्र. | अपिल क्रमांक | अपिलार्थीचे नांव (* उपस्थित अपिलार्थी) |
|---|---|---|
| ०१ | १५८९/२००७ | सौ.प्रमिलाबाई अण्णासाहेब चव्हाण, औरंगाबाद * |
| ०२ | १५९०/२००७ | श्री.आसाराम नागू पाटील, औरंगाबाद |
| ०३ | १५९१/२००७ | श्री.गणेश माणकचंद जोशी, औरंगाबाद * |
| ०४ | १५९२/२००७ | सौ.सुशिलाबाई रतनराव खत्री, औरंगाबाद * |
| ०५ | १५९३/२००७ | सौ.गंगूबाई दोधू चौधरी, औरंगाबाद * |
| ०६ | १५९४/२००७ | श्री.विश्वनाथ महादू काथार, औरंगाबाद * |
| ०७ | १५९५/२००७ | श्री.नंदकिशोर नारायण अंबेकर, औरंगाबाद * |
| ०८ | १५९६/२००७ | श्री.विष्णू गोपाळ काथार, औरंगाबाद |
| ०९ | १५९७/२००७ | श्री.हरिश्चंद्र संताजीराव काथार, औरंगाबाद * |
| १० | १५९८/२००७ | श्री.सत्यनारायण नरसय्या सिंधू, औरंगाबाद |
| ११ | १५९९/२००७ | सौ.सिताबाई रामचंद्र पाटील,औरंगाबाद * |
| १२ | १६००/२००७ | श्री.एकनाथ पुंजाजी वाघ,औरंगाबाद * |
| १३ | १६०१/२००७ | श्री.गणपत संग्रामअप्पा बर्गे,औरंगाबाद * |
| १४ | १६०२/२००७ | श्री.सुहास विश्वनाथ क्षिरसागर,औरंगाबाद * |
| १५ | १६०३/२००७ | श्री.रतन मोतीरामजी कुचे,औरंगाबाद * |
| १६ | १६०४/२००७ | श्री.सर्जेराव भिकाजी सोनवणे,औरंगाबाद * |

| अ.क्र. | अपिल क्रमांक | अपिलार्थीचे नांव (* उपस्थित अपिलार्थी) |
|---|---|---|
| १७ | १६०५/ २००७ | श्री.रघुनाथ शामराव जाधव,औरंगाबाद * |
| १८ | १६०६/ २००७ | श्री.मधुकर आत्माराम वाणी,औरंगाबाद * |
| १९ | १६०७/ २००७ | श्री.गणेशलाल रामचंद्र कुरलीये,औरंगाबाद * |
| २० | १६०८/ २००७ | श्री.सुधाकर शिवराम जोशी,औरंगाबाद * |
| २१ | १६०९/ २००७ | श्री.नामदेव शेनफडू काथार,औरंगाबाद * |
| २२ | १६१०/ २००७ | श्री.काशिनाथ श्रीराम काथार,औरंगाबाद * |
| २३ | १६११/ २००७ | श्री.चंद्रकांत मुरलीधर घोडके,औरंगाबाद |
| २४ | १६१२/ २००७ | सौ.पुष्पलता रामेश्वर चांडक,औरंगाबाद * |
| २५ | १६१३/ २००७ | श्री.धर्मराज विश्वनाथ क्षिरसागर,औरंगाबाद * |
| २६ | १६१४/ २००७ | श्री.प्रभुनारायण जाधव,औरंगाबाद |
| २७ | १६१५/ २००७ | श्री.मुकुंद पांडूरंग हारजुळे,औरंगाबाद * |
| २८ | १६१६/ २००७ | सौ.शांताबाई आत्मारामजी औरंगाबाद * |
| २९ | १६१७/ २००७ | सौ.चंद्रकला चंद्रशेखर ओकणी,औरंगाबाद * |
| ३० | १६१८/ २००७ | श्री.सुभाष भाऊराव तुपे,औरंगाबाद * |
| ३१ | १६१९/ २००७ | सौ.संतपंतकौर प्रितमसींग चंढोक,औरंगाबाद * |
| ३२ | १६२०/ २००७ | श्री.अंबादास बाबूराव शिंदे,औरंगाबाद * |

| अ.क्र. | अपिल क्रमांक | अपिलार्थीचे नांव (* उपस्थित अपिलार्थी) |
|---|---|---|
| ३३ | १६२१/२००७ | श्री.रुषींद पुंजाजी वाघ,औरंगाबाद * |
| ३४ | १६२२/२००७ | श्री.कडूबा गणपतराव भोसले,औरंगाबाद * |
| ३५ | १६२३/२००७ | श्री.प्रशांतकुमार शांतीलाल ठोळे,औरंगाबाद * |
| ३६ | १६२४/२००७ | श्री.कांतीलालजी धोंडीरामजी ठोळे,औरंगाबाद * |
| ३७ | १६२५/२००७ | श्री.दादाराव पांडूजी राउुत,औरंगाबाद * |
| ३८ | १६२६/२००७ | श्री.रामप्रसाद कस्तुरचंद मुंदडा,औरंगाबाद * |
| ३९ | १६२७/२००७ | श्री.चंद्रकांत विठ्ठलराव पुरी,औरंगाबाद * |
| ४० | १६२८/२००७ | सौ.निलम दिलीपकुमार कासलीवाल,औरंगाबाद * |
| ४१ | १६२९/२००७ | श्री.सखाराम गोविंदराव गायकवाड,औरंगाबाद * |
| ४२ | १६३०/२००७ | सौ.कौसल्याबाई त्र्यंबकराव काथार वाणी,औरंगाबाद * |
| ४३ | १६३१/२००७ | श्री.गणेश हरिभाऊ काथार,औरंगाबाद * |
| ४४ | १६३२/२००७ | सौ.पुष्पाबाई शंकरराव काथार,औरंगाबाद * |
| ४५ | १६३३/२००७ | श्री.जनार्दन ओंकार कुबेर,औरंगाबाद * |
| ४६ | १६३४/२००७ | श्री.उमेश त्र्यंबक काथार,औरंगाबाद * |
| ४७ | १६३५/२००७ | सौ.निर्मला नंदकिशोर काथार,औरंगाबाद * |
| ४८ | १६३६/२००७ | श्री.काशिनाथ शंकरराव डहाळे,औरंगाबाद * |

| अ.क्र. | अपिल क्रमांक | अपिलार्थीचे नांव (* उपस्थित अपिलार्थी) |
|---|---|---|
| ४९ | १६३७/ २००७ | श्री.दिलीपकुमार माणकचंद पाटणी,औरंगाबाद |
| ६४ | १६५२/ २००७ | सौ.शेवंताबाई रामसिंग राठोड,औरंगाबाद * |
| ५० | १६३८/ २००७ | श्री.घनश्यामदास गोविंददास वैष्णव,औरंगाबाद |
| ५१ | १६३९/ २००७ | श्री.भगवान त्र्यंबक पायघन,औरंगाबाद * |
| ५२ | १६४०/ २००७ | श्री.उदय त्र्यंबकराव काथार वाणी ,औरंगाबाद * |
| ५३ | १६४१/ २००७ | अध्यक्ष,सुधारीत डी.पी. रोड हटाव कृती समिती,औरंगाबाद * |
| ५४ | १६४२/ २००७ | श्री.रमेश घाशीराम शर्मा,औरंगाबाद |
| ५५ | १६४३/ २००७ | श्री.रमेश बाबूराव झंवर , औरंगाबाद * |
| ५६ | १६४४/ २००७ | सौ.सुनंदा भालचंद्र चुडीवाल,औरंगाबाद |
| ५७ | १६४५/ २००७ | सौ.रत्नमाला भालचंद्र ठोळे,औरंगाबाद |
| ५८ | १६४६/ २००७ | श्री.इंदरचंद कचरदास गंगवाल,औरंगाबाद |
| ५९ | १६४७/ २००७ | श्री.संजयकुमार इंदरचंद गंगवाल,औरंगाबाद |
| ६० | १६४८/ २००७ | श्री.सुरेश मुरलीधर खोडदे,औरंगाबाद * |
| ६१ | १६४९/ २००७ | सौ.शोभा विश्वनाथ संगेकर,औरंगाबाद * |
| ६२ | १६५०/ २००७ | श्री.नारायण सीताराम काथार,औरंगाबाद * |
| ६३ | १६५१/ २००७ | श्री.श्रीराम सीताराम काथार,औरंगाबाद * |

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४४
निर्णय दिनांक : ०५-०९-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जयनारायण मोहनलाल शर्मा,<br>रा. ता.जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>निबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,<br>नांदेड ता.जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा न्यायाधीश,<br>जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जयनारायण मोहनलाल शर्मा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अच्युत भिमराव कोमवाड, जन माहिती अधिकारी तथा निबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचे प्रतिनिधी श्री. मोहंमद तय्यब मो.इसहाक, कनिष्ठ लिपीक, (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१४.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा व सत्र न्यायालयातील विशेष दिवाणी दावा क्र.४६/९८ च्या संदर्भातील दि. ८.१.९९ च्या निकालासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"विशेष दिवाणी दावा क्र.४६/९८ (निकाल दि. ८.१.९९) मधील ऋणको क्र.२ हे दि. ६.३.९९ रोजी निधन झाले, यांची माहीती सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्द

झाली असुन उतराधीकारी यांनी संबंधीत वादात त्याची सुचना दिली असतांना मृत्यूच्या सहा महिन्यानंतर मयताने मार्फत वकील अर्ज वादात निशानी क्र.१२८ अन्वये प्रस्तूत केला व वादातील दस्तऐवज उचलून घेतले व त्या दस्तऐवजाचा वादात दूसऱ्या तर्फे उपयोग करवून निर्णयावर परिणाम घडवून आणला. याबाबतची कैफियत प्रस्तूत करणेस योग्य न्यायमंदिर (फोरम) ची माहीती मिळणे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारण्यात येत असल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी म्हणजे दि. १७.७.२००७ रोजी पारित केले व या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.सदर द्वितीय अपील अर्जात त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अधिनियमातील कलम ६ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.३.२००७ रोजी काही माहिती मागितली होती. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याचे खालील कारणास्तव नाकारले.

"01. Applications are not complete in all respect.

02. The information is contained in published material available to public.

03. Information called is prescribed in law books.

04. Court fees of Rs. 02/- (two) is deficit."

जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्यांसंबंधीचे वरील चारही मुद्दे अपिलार्थीस मान्य नाहीत, कारण त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेला अर्ज हा सर्व प्रकारे पूर्ण करुन दिला आहे.अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जर फॉर्मसोबत भरण्याची फी मध्ये काही तफावत असली, तर ती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे गरजेचे आहे. तथापि अशाप्रकारची कोणतेही पत्र त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाही. त्यांनी ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली होती, त्या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास पुढीलप्रमाणे विशद केली.

विशेष दिवाणी दावा क्र.४६/९८ चा निकाल दि. ८.१.१९९९ रोजी लागला. सदर निकालानंतर दि. ६.३.१९९९ रोजी या दाव्यातील प्रतिवादी क्र. २ यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सहा महिन्याच्या कालावधीनंतर दि. २२.९.१९९९ रोजी न्यायालयामध्ये मयत व्यक्तीच्या नावाने दस्तऐवज उचलून घेण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये संबंधित वकीलाने एका खोटया व्यक्तिला न्यायालयामध्ये उभे करुन संबंधित दस्तऐवज प्राप्त करुन घेण्यासाठी परवानगी मिळवून दस्तावेज प्राप्त करुन घेतले व त्यांनी अशाप्रकारे प्राप्त करुन घेतलेल्या दस्तऐवजांचा उपयोग अन्य वादात केला. सदर प्रकार हा न्यायालयाची फसवणूक करणारा असल्याने अपिलार्थीने ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास एका वेगळया तक्रारीद्वारे आणून दिली. यावर जिल्हा व सत्र न्यायालयाने दि. १२.८.२००२ रोजी कोणताही निर्णय न घेता, अपिलार्थीसच योग्य न्यायालयासमोर न्याय मागण्याचा सल्ला दिला, 'असे योग्य न्यायालय कोणते', याची माहिती अपिलार्थी यांना हवी आहे.

वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने देखील अशाचप्रकारचे आदेश दि. ५.४.२००२ रोजी पारित केले, असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. त्यांनी

मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. तसेच या प्रकरणी त्यांना झालेल्या मनस्तापाबद्दल त्यांना नुकसान भरपाई मिळावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी विनंती त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगासमोर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती ते अपिलार्थीस देऊ शकतात. परंतु अपिलार्थीने त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सल्ला मागितला आहे. अशाप्रकारचा सल्ला देण्यासाठी प्रत्येक जिल्हा न्यायालयामध्ये 'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण' नावाचे एक कार्यालय स्थापन केले गेले आहे. अपिलार्थी यांना आवश्यक असलेला सल्ला संबंधित कार्यालयाकडून अपिलार्थीने नियमानुसार त्यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर त्यांना प्राप्त होऊ शकतो. जी माहिती कोणत्याही विधी शाखेच्या पुस्तकामध्ये सहजरित्या उपलब्ध आहे. अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस देणे, मा. उच्च न्यायालयाने दि. ९.१२.२००६ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार आवश्यक नाही. अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचा मनस्ताप दिलेला नाही.अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे संबंधित वकिलाने खोटी व्यक्ति उभी केली, हे म्हणणे त्यांना मान्य नाही. एखाद्या प्रकरणावर न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सदर प्रकरण संपुष्टात येते, त्यानंतर जर त्या प्रकरणाशी संबंधित एखादी व्यक्ति मृत झाली असेल तर, त्याबाबतचा पुरावा नंतर कोर्टामध्ये नोंदविला जात नाही. बंद झालेल्या नस्तीमध्ये अशाप्रकारचा पुरावा असणे स्वाभाविक नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला आहे. यामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलार्थीने दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोवर भाष्य केले आहे. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि.

१७.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

" The appeal is having no force in the light of Rules framed by the Honourable High Court. This Authority has rejected the appeal by observing in para No. 6 that the information of the nature, as to if the filing of such documents in subsequent proceeding has affected the previous judgment in Special Civil Suit No.46/1998, can not be provided because such information itself is not the information at all but it is a question of law and facts to be decided by the competent court before whom the matter is pending. It is a question of law and the information so sought is available to the appellant in law books……………………………………………………………

….Moreover the information about ***'forum'*** sought by the appellant is not information, but it is a legal advice………………….I have found no good ground to allow the appeal, as it was explicitly clear from the order that the information sought is contained in published material available to public and it is prescribed in law books. The appellant can very well had it from those law books and published material available to public. Hence the instant appeal bears no merit. It deserves to be dismissed……….

I have held that the information of the nature sought by the appellant is not information. The information sought by application is all about seeking advice as to recourse available in a judicial proceeding……

……..The Public Information Officer can not be expected to exercise powers of the court. The information relating to forum is

available in published material available to public in the form of Law Books, Journals etc."

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अधिनियमातील कलम २८ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यास या कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात नियम करण्याचे अधिकार दिलेले आहेत. अधिनियमातील कलम ३ (ङ) मध्ये 'सक्षम प्राधिकारी' या शब्दाची व्याख्या दिली आहे. यातील उपकलम तीन प्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणीचे नियम करण्यासाठी प्राधिकृत केले आहे. या तरतुदींच्या अधीन राहून मा. उच्च न्यायालयाने त्यांच्याकडील दि. ९.१२.२००६ रोजीच्या अधिसूचनेनुसार त्यांचे अधिनस्त कार्यालयासाठी हे नियम अंतीम केलेले आहेत. यातील परिच्छेद ९ मध्ये अर्जदारास माहिती नाकारण्यासंबंधी एक नमुना परिपत्रक (प्रपत्र- 'सी') तयार केले आहे. यामध्ये असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालयाने जर एखादी माहिती छापील पुस्तकात उपलब्ध असेल तर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे त्यांच्यावर बंधनकारक नाही, अशी तरतुद केली आहे, ती पाहता व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, दिवाणी प्रक्रिया संहिता किंवा इतर कायद्याच्या पुस्तकांमध्ये सहजरित्या उपलब्ध असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या माहिती अधिकार अधिनियमातंर्गत पारित केलेल्या नियमातील तरतुदींच्या मर्यादांमध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केल्यास, अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची नसल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना एका विशिष्ट प्रकरणासंदर्भात हवी आहे.अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये 'advice' अंतर्भूत असल्याचे नमूद केले, यावर आयोगाचे मत असे आहे की, अपिलार्थीस अपेक्षित विशिष्ट प्रकरणाशी संबंधित "सल्ला" असे त्याचे

स्वरुप नाही. एखाद्या अभिलेख्यामध्ये अस्तित्त्वात असलेल्या "सूचना" असे त्याचे स्वरुप आहे.अपिलार्थीस माहिती देताना कोणत्याही स्वरुपातील साहित्य अशा स्वरुपातील माहिती अर्जदारास देय ठरते. प्रस्तुत प्रकरणात या कारणास्तव अपिलार्थीचा ‘advice’ या विषयावरील युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती, ‘माहिती’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे आयोगाचे मत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूर्वक त्रास दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही, त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुन व त्यांना नेमून दिलेल्या कायदेशीर मर्यादेत निर्णय दिला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही कार्यवाहीचे आदेश नाहीत.

उपरोक्त परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील दिलेल्या निर्णयास सहमती देऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयनारायण मोहनलाल शर्मा, रा. नरोबा मंदिराजवळ, हिंगणेवाडा, बसवेश्वरनगर, कौठा, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा निबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८७
निर्णय दिनांक : ०५-०९-२००८

१ श्री. दत्ता गणपत काकडे पाटील, : अपिलार्थी
मु.पो.टाकळी कोलते ता.भोकरदन, जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (महसूल)
तहसील कार्यालय, भोकरदन,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, भोकरदन,
जि.जालना

त्रयस्थ पक्षः सौ. सुमन रघुनाथ सोनवणे

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दत्ता गणपत काकडे पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रामलाल म्हतारबा जाधव, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन जि. जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष सौ. सुमन रघुनाथ सोनवणे (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२३.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे टाकळी कोलते ता. भोकरदन जि.जालना येथील स्वस्त धान्य दुकानदार सौ. सुमनबाई रघुनाथ सोनवणे यांच्याशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"स्वस्त धान्य दुकाणदार सौ. सुमन रघुनाथ सोनवणे रा. टाकळी कोलते ता.भोकरदन यांनी दि. ३१ मार्च २००२ ते ३१ मार्च २००७ पर्यंत गहु, तांदुळ व रॉकेल किती उचलले व कसे वितरीत केले याचा तपसिल सत्य प्रतित."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती नियमानुसार फीस भरुन दि. ३०.६.२००७ पर्यंत घेऊन जाण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्याचा प्रतिपृष्ठ दर अपिलार्थीस कळविला नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेनुसार अपिलार्थीने कोणतीही कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. ९.८.२००७ रोजीच्या पत्राने, माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहिले असता, त्यांना माहिती प्राप्त झाली

नाही, त्यामुळे त्यांनी या प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे का अपील करु नये, अशा अर्थाची पृच्छा केली.  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.८.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज दि. २३.५.२००७ रोजी केला होता. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते शुल्क भरुन दि. ३०.६.२००७ पर्यंत त्यांच्या कार्यालयामधून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. परंतु ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता त्यांना सदरची माहिती प्राप्त होऊ शकली नाही, तसेच निश्चितपणे किती शुल्क भरावयाचे याची कल्पना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी, अशी त्यांनी आपल्या युक्तीवादाचे शेवटी आयोगास विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती स्वस्त धान्य दुकानदार मौ. सुमन रघुनाथ सोनवणे यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविता आली नाही. सदर स्वस्त धान्य दुकानदाराविषयी तक्रारी प्राप्त झाल्याने जिल्हा  पुरवठा अधिकारी, जालना यांनी या दुकानाचा परवाना रद्द केला होता. या प्रकरणी

चौकशीकामी त्यांनी उपलब्ध सर्व कागदपत्रे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली होती. या प्रकरणाची सुनावणी उपआयुक्त (पुरवठा), औरंगाबाद यांच्याकडे चालू असून त्यांचा निर्णय नुकताच उपआयुक्त (पुरवठा) यांनी दिलेला आहे. आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याची त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २३.५.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये म्हणजे अधिनियमातील विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद चुकीचा आहे. कारण या प्रतिसादामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा प्रतिपृष्ठ दर कळविला नाही. या पत्रामध्ये त्यांनी नियमानुसार फी त्यांच्या कार्यालयात भरुन अपिलार्थीस दि. ३०.६.२००७ पर्यंत माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले, एवढी सूचना करुनही त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या द्वितीय अपिलावरील सुनावणी होईपर्यंत देखील त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती देण्याची कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी श्रीमती सोनवणे यांना २००२ ते २००७ या कालावधीत गहू, तांदूळ व रॉकेल किती दिले याची माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये नियतन रजिष्टरमध्ये उपलब्ध असणे अनिवार्य आहे. तथापि ही माहिती देखिल त्यांनी अपिलार्थीस पुरवण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही आज रोजी पूर्णतया जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांच्या ताब्यात आहे, असे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, अधिनियमातील कलम ७(६)नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य पुरवावी लागेल. आजच्या युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी हे सदर माहिती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार असल्याचे त्यांनी कबूल केले आहे.

या टप्प्यावर जरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होणार असली तरी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, कोणत्याही प्रकारे वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रतिसाद दिला नाही तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता, अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे पुरेपूर दर्शन घडविल्याचे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. त्यांनी जर या अपील अर्जाची वेळीच दखल घेतली असती तर, कदाचित अपिलार्थीस द्वितीय अपील करण्याची गरज पडली नसती. अशातऱ्हेने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपवाई स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.सबब विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता गणपत काकडे पाटील मु.पो.टाकळी कोलते ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, भोकरदन यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८८
निर्णय दिनांक : ०५-०९-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, मु.पो. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ ता.सेलू, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०९.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. चारुशीला लक्ष्मणराव पंडित, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू, जि.परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन ),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१४.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषदेकडे थकित असलेल्या देयकाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"नगर परिषदेकडे वेगवेगळया विषयी थकीत देय असलेल्या थकबाकीबाबतची संपूर्ण तपशीलवार माहिती उदा. सर्व प्रकारे कंत्राटदार, वर्तमानपत्रे जाहीरातीबद्दल, स्टेशनरी, पाणीपुरवठा विभागासाठी लागणारे साहित्य पुरवठा करणारे इत्यादीबाबतची सर्व थबकाकी देय असणाराबद्दलची माहिती...."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती नगर परिषदेच्या कार्यालयात तयार असल्याचे व ती हस्तगत करण्याचे त्यांना सूचित केले. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ८.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या या पत्राद्वारे त्यांना माहिती देत असल्याचे कळविले, तथापि यावेळी त्यांनी फक्त पत्र दिले परंतु माहिती दिली नाही. त्यानंतर परत दि. १०.८.२००७ रोजी अपिलार्थीस पत्र देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार आहे. सदर पत्र प्राप्त होताच ही माहिती हस्तगत करावे, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी नगरपरिषदेच्या कार्यालयात माहिती हस्तगत करण्यासाठी उपस्थित राहिले असता, त्यांना नगरपरिषद कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणतेही वेळेचे बंधन घातल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.९.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे १८.७.२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दि. ८.८.२००७ व १०.८.२००७ रोजी प्रतिसाद दिला. यापैकी दि. ८.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये सोबत माहिती जोडल्याचे म्हटले आहे, परंतु माहिती जोडली नाही व दि. १०.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस कळविले. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते नगरपरिषदेच्या कार्यालयात गेले असता, ही माहिती त्यांना नगरपरिषदेच्या कार्यालयाने उपलब्ध करुन दिली नाही. त्यांना आवश्यक ती माहिती नगरपरिषदेच्या कार्यालयाकडून दि. ४.९.२००८ रोजी प्राप्त झाली. सदर माहिती त्यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे 'तपशीलवार' या स्वरुपात नाही. त्यांना विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी हे जबाबदार असल्याने या विलंबाप्रीत्यर्थ त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. १०.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थी, ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थीस त्यांनी सूचना देऊनही अपिलार्थीने आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः हस्तगत करुन न नेल्याने त्यांनी ती रजिस्टर्ड पोस्टाने दि. २.९.२००८ रोजी अपिलार्थीस पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १८.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. १३.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.८.२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याच्या सूचना दिल्या.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असे होते. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे थकबाकीबाबतची संपूर्ण तपशीलवार माहिती मागितली आहे. 'तपशिलवार' या शब्दाद्वारे अपिलार्थीस नगरपरिषद, सेलू येथील वेगवेगळया खात्यातील माहिती हवी असल्याचे त्यांनी याच अर्जामध्ये वानगीदाखल दिलेल्या उदाहरणावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे माहिती देखील पुरविली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले नसल्याचे त्यांच्या युक्तिवादावरुन दिसून येते. त्यांना याहूनही अधिक तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. मात्र तपशीलवार माहिती नेमकी कोणत्या मुद्यावर त्यांना हवी आहे, याचा उल्लेख त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे त्यांना अपेक्षित असलेला तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त न होण्यासाठी, त्यांना स्वतःला त्यांच्या माहितीची मांडणी व्यवस्थितरित्या न करता आल्यामुळे ते स्वतःच जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे.सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अर्धवट असल्याचा अपिलार्थी यांचा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. मात्र अपिलार्थीस दि. १४.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दि. १३.६.२००७ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि या प्रकरणी जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.८.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचा दि. ८.८.२००७ रोजीचा प्रतिसाद आयोग ग्राहय धरत नाही. कारण या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविणे भाग होते. तथापि अशाप्रकारची कार्यवाही त्यांनी येथे केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दि. १०.८.२००७ रोजी तयार होती, असा त्यांचा युक्तिवाद जरी मान्य केला तरी अपिलार्थीस त्यांनी दिलेला प्रतिसाद हा अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने दिला असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. या विलंबाचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे केले की, त्यांना सदर माहिती त्यांच्या कार्यालयातील वेगवेगळया विभागाकडून प्राप्त करुन घेऊन व नंतर ती संकलीत करावयाची होती, त्यांच्या कार्यालयातील काही विभागाकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली व याची परिणिती अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला.  जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. कारण कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी तीस दिवसांच्या आत निर्णय देणे हे माहिती अधिकार अधिनियमाचे मुख्य सूत्र आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक व कर्मचारी हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे दिसून येते. वर म्हटल्याप्रमाणे त्यांनी सर्वांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी एकूण ५७ दिवसांचा असमर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्यामुळे विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.१४,२५०/- इतकी शास्ती

संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहायक व कर्मचारी यांना एकत्रितपणे लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे ऑक्टोबर,२००८ पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

उपरोक्त शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे.

अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

४. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

५. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ ५७ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रुपये १४,२५०/- (अक्षरी रुपये चौदा हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

६.उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी.

७.संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे कोषागारात भरतील असे उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०९-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, मु.पो. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ ता.सेलू, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तालुका कोषागार अधिकार, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८६

निर्णय दिनांक ०५-०९-२००८

१ श्री. अमर अंबादासराव कदम, : अपिलार्थी
रा. परमेश्वर वाडा, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षण उपसंचालक,
लातूर विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी : शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०९-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अमर अंबादासराव कदम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. महारुद्र त्र्यंबकाप्पा बोळेगावे, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सदानंद शंकरराव शिंदे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सह शिक्षक, शिक्षक, मुख्याध्यापक इत्यादी पदांच्या (सेवेच्या शर्ती) नियुक्ती नियमावलीसंदर्भात सन १९९७ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " सन १९९७ ते २००६ च्या मधील नियमावलीत अद्यापपर्यंत बदल झाला असेल तर

१. एखाद्या सह शिक्षकास (माध्यमिकच्या) त्याच्या २ वर्षांच्या परिविक्षादिन कालावधीत पदोन्नती घेता येते का ?

२. मुख्याध्यापक पदास कमीत कमी किती वर्षाचा सेवेचा अनुभव आवश्यक आहे.

३. एखादया संस्थेने ठरविले की एखादया सहशिक्षकास मुख्याध्यापक पदास नेमणूक करायची त्यांना वर्तमानपत्रात जाहिरात न देता सेवेचा अनुभव नसताना संस्थेस मुख्याध्यापक पदाची नियुक्तीचा अधिकार आहे का ?

४. एखादया सहशिक्षकाच्या परिविक्षादिन कालावधीत संस्थेस अधिकार त्या सह शिक्षकाच्या वेतनश्रेणीसह, मुख्याध्यापक पदाचा ठराव घेऊन घेण्याचा आहे का ?

५. संस्थेच्या अध्यक्षाने ठराव न घेता आपणास मुख्याध्यापक पदाची अनुभव अट शिथील करण्याचे पत्र व्यवहार केला असेल तर कर्मचारी (सेवेच्या शर्ती)

नियमावली १९८१ मधील नियम क्र. ३ (२) च्या अधिन राहुन मुख्याध्यापक पदास आवश्यक असणारी अनुभव अट शिथील करता येते का ?"

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ / २२-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याने, ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले व महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये काही बदल झाला नसल्याचे अपिलार्थीस कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००७ रोजी एक पत्र लिहिले असून, अपिलार्थीस त्यांच्या अपील अर्जासंदर्भात आवश्यक ती माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात येत आहे व ती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविले. यानंतर शिक्षण संचालक कार्यालयाने अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला नसल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही माहिती

दिली नाही, त्यांच्या अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही व माहिती अधिकार कायद्याला बगल देऊन कोणतीही निर्णयात्मक भूमिका त्यांनी घेतली नसल्याचे नमूद केले आहे व त्याच बरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी त्यामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आज रोजी आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांना विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर फक्त एक पत्र लिहून त्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होताच ती त्यांना कळविण्यात येईल असे म्हटले होते. यासंदर्भात त्यांनी देखिल आजतागायत कोणतीच कारवाई केली नसल्यामुळे संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे (प्रशासकीय अधिकारी, पुणे) असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळी जन अपिलीय अधिका-याची नेमणूक न केली गेल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज अनुत्तरित राहिला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. यातील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती, ''माहिती'' या शब्दाच्या

व्याख्येशी विसंगत असल्याचे दिसून येईल. अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमाव्दारे माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास देण्यासंबंधीचा या तरतुदीअंतर्गत निर्णय घेणे या संपूर्ण प्रक्रियेमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे, कारणे, त्यांचे स्पष्टीकरण मागणे व ते संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा यामध्ये समावेश नाही हे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ ची माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही, मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे विचारलेली, ‘‘मुख्याध्यापक पदास कमीत कमी किती वर्षाचा सेवेचा अनुभव आवश्यक आहे’’ ही माहिती, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००७ रोजी ही माहिती पुरविली आहे, तथापि हे पत्र व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भाने प्राप्त झालेले पत्र यातील दिनांकामध्ये फरक असून अपिलार्थीस प्राप्त झालेल्या पत्रामध्ये या पत्राचा दिनांक 22 Jan 2007 असा उल्लेख केला आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालयाने या पत्रावर 22 Jan 2007 असा शिक्का शाईने इंग्रजीमध्ये उमटवला आहे तर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केलेल्या या पत्राच्या प्रतीवर दिनांक या शब्दासमोर 9-1-07 असे हस्ताक्षरात लिहिलेले आहे. आयोगास सादर करण्यात आलेल्या प्रतीवर सत्यप्रत म्हणून सहाय्यक शिक्षण संचालक यांची सही आहे. अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली आहे, परंतु यामध्ये अपिलार्थीस पाठविलेल्या ११२२ या क्रमांकाच्या पत्राचा उल्लेख आहे, परंतु हे पत्र अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या तारखेस पाठविले याचा कोठेही उल्लेख नाही. या उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षतः त्यांनी ही माहिती दिनांक २२-०१-२००७ रोजी पाठवूनही त्यांनी

आयोगास ही माहिती दिनांक ०९-०१-२००७ रोजी पाठविल्याचा खोटा पुरावा तयार करण्याचा त्यांनी, प्रयत्न केल्याचे या प्रकरणी आयोगास दिसून येत आहे. सबब अपिलार्थीस प्राप्त झालेल्या पत्रावरील दिनांक २२-०१-२००७ ही तारीख आयोग सत्य मानत आहे. या पत्रानुसार अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या प्रथम अर्जास प्रतिसाद देण्यासाठी विहीत मुदतीपेक्षा ६ दिवसांचा विलंब लावल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. केवळ अधिनियमातील कलम २० च्या तरतुदींपासून बचाव करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी खोटा पुरावा निर्माण करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे, तसेच त्यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्रावर सत्यप्रत म्हणून सही केली आहे ही सही देखिल त्यांनी या पत्राची मूळ प्रत पाहून केली किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे.

उपरोक्त प्रकरणी वरील पार्श्वभूमीवर अपिलार्थीस ६ दिवस इतक्या विलंबाने अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम प्रतिसाद दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा सहा दिवस इतक्या विलंबाने दिलेल्या प्रतिसादाबाबत त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १५०० /- (अक्षरी- रुपये एक हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त तीन हप्त्यात करावा.

शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी हे या शास्तीचा भरणा नियमीतपणे ऑक्टोबर २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याध्यापक पदाच्या सेवा प्रवेश व पदोन्नतीसंदर्भात असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या नियमांची झेरॉक्स प्रत हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, शिक्षण संचालक यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतली नाही, त्यांची ही कृती अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत असून इत:पर त्यांनी यापुढे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर निर्णय घेऊन तो निर्णय प्रत्येक अपिलार्थीस प्राप्त होण्याकरिता सतर्क राहावे असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती व मुख्याध्यापक पदाच्या सेवा प्रवेश व पदोन्नतीच्या विहित नियमांची प्रत हे आदेश निर्गमित होताच त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबाबाबत एकूण रुपये १५०० /- (अक्षरी- रुपये एक हजार पाचशे)

इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

औरंगाबाद
दिनांक ०५-०९-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अमर अंबादासराव कदम, रा. परमेश्वर वाडा, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.